MHPA15000105-2026

खटला दाखल दिनांकः २०.०१.२०२६
खटला नोंदणी दिनांकः २०.०१.२०२६
खटला निकाल दिनांकः १९.०६.२०२६
कालावधी ०० वर्ष ०५ महिने ०० दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू यांच्या न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारीः जि.ए.तराळ)**

फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०९/२०२६ नि.क्र.१५
सी.एन.आर.क्र. एम.एच.पी.ए.१५०००१०५.२०२६

**०१. सोनाली भ्र. अतुल पांढरे,**
वय ४२ वर्ष, धंदा–घरकाम,

**०२. अभिषेक पि. अतुल पांढरे,**
वय १५ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र.१,

**०३. कमल पि. अतुल पांढरे,**
वय ११ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र.१,

वरील सर्वजण रा. वालुर ता. सेलु जि. परभणी
ह.मु. व्दारा, आश्रोबा बेंगाळ वालुर, ता. सेलु,
जि. परभणी.

**–अर्जदार.**

**–विरुध्द–**

**अतुल पि. सुर्यभान पांढरे,**
वय ४५ वर्ष, धंदा– शेती,
रा. वालुर ता. सेलु जि. परभणी.

**–गैरअर्जदार.**

प्रकरणः– फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगी मंजूर करणे बाबत.

-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

अर्जदारातर्फेः– श्री. यु.के. काष्टे वकील

गैरअर्जदारांतर्फेः– एकतर्फा

-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

न्यायनिर्णय

(घोषित दिनांक १९.०६.२०२६)

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १४४ नुसार गैरअर्जदाराकडून अर्जदार क्र. १ हिला रक्कम रुपये १५,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १०,०००/– मासिक पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन खालील प्रमाणेः–**

**०२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ चा विवाह गैरअर्जदारासोबत हिंदु धर्म रितीरिवाजाप्रमाणे दिनांक १४.०३.२००९ मध्ये वालुर ता. सेलु जि. परभणी येथे अर्जदाराच्या आई–वडीलांनी मोठ्या थाटामाटात करुन दिला. उभयतांना लग्न संबंधातुन तीन अपत्य दोन मुले अभिषेक व विशाल आणि एक मुलगी कोमल असे प्राप्त झाले व अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे लग्न संबंध आजही कायम आहेत.

**०३.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, लग्नानंतर ती गैरअर्जदारासोबत सासरी वालुर येथे नांदावयास गेली. लग्नानंतर अर्जदार क्र. १ हिला सुरुवातीचे काही वर्षे बरे नांदवले. त्यानंतर गैरअर्जदार हा दारुच्या व्यसनी जाऊन त्याने अर्जदारासोबत क्षुल्लक–क्षुल्लक कारणावरुन जसे की, घरातील नेहमीचे भांडे, स्वयंपाक, घरातील साफसफाई व इतर बाबींवरुन अर्जदारास शारीरीक व मानसिक त्रास देऊ लागला. अर्जदाराने त्यास त्रास देण्याचे कारण विचारले असता त्याने अर्जदाराचे वडीलांकडुन पैशाची अपेक्षा असल्याचे बोलुन दाखविले. तसेच अर्जदारास माहेरावरुन तीन लाख रुपये शेतामध्ये नवीन विहीर पाडण्याकरीता घेऊन येण्याची मागणी केली. तसेच अर्जदाराचा मोठा मुलगा अभिषेक हा जन्मत: अपंग असुन तो अपंग का झाला व तो अपंग होण्यास अर्जदार जबाबदार असल्याने असे माणुन तिचा सतत शारीरीक व मानसिक त्रास दिलेला आहे. तसेच गैरअर्जदार हा दारु

पिवुन सतत अर्जदारांना रात्री अपरात्री घराबाहेर हाकलुन देत असत व उपाशी पोटी ठेवुन मारहाण करीत असत व घाण–घाण शिवीगाळ करुन अर्जदाराचा मानसिक व शारीरीक व भावनिक छळ करीत असत. तसेच अर्जदारांना वाटेल तेंव्हा घराबाहेर काढुन माहेरी जाण्यास सांगत असत. त्यामुळे अर्जदाराला तिच्या मुलाबाळासह माहेरी राहण्यास भाग पाडलेले आहे.

०४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सन २०२४ मधील नागपंचमी सणाचे अगोदर गैरअर्जदारांनी अर्जदारास अतिशय अमानुषपणे मारहाण केली व उपाशीपोटी ठेवले त्यामुळे तिला सदरचा त्रास असह्य झाल्याने तिची बहिण व इतर माहेरच्या नातेवाईकांना पैशाच्या कारणावरुन गैरअर्जदार हा त्रास देत असल्याबाबत कळविले असता त्यांनी गैरअर्जदाराला समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदाराने त्या सर्व नातेवाईकांना घाण–घाण शिवीगाळ करुन अपमानास्पद वागणुक दिली व तेथुन हाकलुन दिले. गैरअर्जदार हा पैशाच्या कारणावरुन अर्जदारास जाचक शारीरीक व मानसिक त्रास दिल्याची बाब तिने तिच्या आई–वडीलांना सांगीतल्याचा राग मनात धरुन त्याने अर्जदार व तिचे आई–वडील यांच्या विरोधात रागाच्या भरात खोटी केस केली. दरम्यानच्या काळात अर्जदार ही सासरी असतांना दिनांक ३१.०१.२०२५ रोजी गैरअर्जदाराने अर्जदारास तिच्या आई–वडीलांकडुन तीन लाख रुपये शेतात विहीर पाडण्याकरीता का आणत नाहीस असे म्हणुन मारहाण केली व उपाशीपोटी अंगावरील सर्व सोन्या–चांदीचे दागीने काढुन घेऊन अंगावरील कपड्यानिशी अपंग मुलगा अभिषेक व मुलगी कोमलसह मुलगा विशाल यास त्याच्याकडे ठेवुन घराबाहेर हाकलुन दिले.

०५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदाराने दिलेल्या शारीरीक व मानसिक त्रासामुळे तिचे शरीर अतिशय जिर्ण झाले असुन ती नेहमी आजारी असते व मुलमा अभिषेक हा अपंग असल्याने त्याची संपुर्ण सुश्रुषा ही अर्जदार हिला करावी लागते तसेच ती त्याला सोडुन कोठेही बाहेर जाऊ शकत नाही. त्यामुळे अर्जदार कोणताही कामधंदा करु शकत नाही. तसेच अर्जदार क्र. ३ ही शाळेत शिकायला असुन अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही ठोस साधन नाही. अर्जदार ही परावलंबी असुन तिच्याकडे उत्पन्नाचे

कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार हा सधन कुटुंबातील सदस्य असुन तो एका बागायती शेतकरी कुटुंबातील सदस्य असुन त्याच्याकडे पाच ते सहा एक्कर बागायती शेत जमीन आहे. त्यापासुन तो मोठे उत्पन्न मिळुन त्याला बारा ते तेरा लाख रुपयाचे निव्वळ नफा वर्षाकाठी शिल्लक राहतो. तसेच गैरअर्जदार याच्याकडे कुक्कुटपालनाचा व्यवसाय असुन त्यापासुन त्याला पाच ते सहा लाख रुपयाचा निव्वळ नफा मिळवतो. असे एकंदरीत वर्षाकाठी गैरअर्जदारास आठरा ते वीस लाख रुपयाचे उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना सहज पोटगी देऊ शकतो. करीता अर्जदारांनी गैरअर्जदाराकडुन अर्जदार क्र. १ हिला प्रतिमहा रक्कम रुपये १५,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रतिमहा प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– पोटगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०६.** प्रस्तुत प्रकरणातील आदेशीका ही गैरअर्जदार याला तामिल झाल्यानंतर तो हजर झाला नसल्यामुळे निशाणी क्र.०१ वरील दिनांक १८.०३.२०२६ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचे प्रकरण गैरअर्जदार विरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

**०७**. अर्जदाराच्या अर्जातील कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात, त्या प्रत्येक मुद्यांचा निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| ०१. अर्जदार असे सिध्द करते काय की, गैरअर्जदाराने सबळ कारणाशिवाय तिचा व अर्जदार क्र. २ व ३ यांचा सांभाळ करण्यास नाकारले ? | होय. |
| ०२. अर्जदार असे सिध्द करते काय की, ती स्वतःचा व अर्जदार क्र. २ व ३ चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे ? | होय. |
| ०३. अर्जदार असे सिध्द करते काय की, ते गैरअर्जदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे ? असल्यास किती ? | अंशत:होकारार्थी |
| ०४. आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०८. अर्जदाराने स्वतःची बाजु सिध्द करण्यासाठी तिची साक्ष (सा.क्र.१) निशाणी क्र.०८ वर नोंदविली असुन तिच्या पुराव्याच्या पुष्ठर्थ तिने गट क्रमांक ८५/३ च्या सात–बारा उताऱ्याची प्रत (निशाणी क्र.११), गट क्रमांक ८५/१ च्या सातबारा उताऱ्याची प्रत (निशाणी क्र.१२) प्रमाणे दाखल केली असुन निशाणी क्र.१३ वर अर्जदाराने तिचा पुरावा संपल्याची पुरसी दाखल करुन पुरावा बंद केला आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे गैरअर्जदारा विरुध्द एकतर्फा असल्याने त्याने अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. तसेच अर्जदाराचा पुरावा देखील अव्हानीत केलेला नाही.

०९. मी अर्जदाराच्या वतीने विद्वान वकील श्री. यु.के.काष्टे यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ करिताः–**

१०. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी ०८ वर दाखल केले आहे. या व्यतिरीक्त अर्जदाराने इतर कोणताही पुरावा सादर केला नाही. गैरअर्जदारातर्फे अर्जदाराचा उलटतपास घेण्यात आला नाही. तसेच त्याने त्याच्यामार्फत त्यांचे म्हणणे अथवा इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

११. अर्जदार हिने तिच्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये तिच्या अर्जातील कथनांचा पुनरुच्चार करुन गैरअर्जदाराचे उत्पन्न लक्षात घेतला तर तिला दरमहा रक्कम रुपये पंधरा हजार व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रुपये दहा हजार रुपये पोटगी देऊ शकत असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार प्रस्तुत प्रकरणात हजर न झाल्याने, तसेच उलटतपास घेऊन अर्जदाराची सत्यता पडताळलेली नाही. त्यामुळे अर्जदाराचा संपूर्ण पुरावा विनाअव्हानीत राहिला.

१२. अर्जदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक १४.०३.२००९ रोजी हिंदु धर्म रितीरिवाजाप्रमाणे मौजे वालुर ता. सेलु जि. परभणी येथे झालेला असुन उभयतांचे पती–पत्नीचे नाते संबंध कायम आहेत. त्यानंतर गैरअर्जदार हा दारुच्या व्यसनी जाऊन त्याने अर्जदारासोबत क्षुल्लक–क्षुल्लक कारणावरुन

जसे की, घरातील नेहमीचे भांडे, स्वयंपाक, घरातील साफसफाई व इतर बाबींवरुन अर्जदारास शारीरीक व मानसिक त्रास देऊ लागला. अर्जदाराने त्यास त्रास देण्याचे कारण विचारले असता त्याने अर्जदाराचे वडीलांकडुन पैशाची अपेक्षा असल्याचे बोलुन दाखविले. तसेच अर्जदारास माहेरावरुन तीन लाख रुपये शेतामध्ये नवीन विहीर पाडण्याकरीता घेऊन येण्याची मागणी केली. तसेच अर्जदाराचा मोठा मुलगा अभिषेक हा जन्मत: अपंग असुन तो अपंग का झाला व तो अपंग होण्यास अर्जदार जबाबदार असल्याने असे माणुन तिचा सतत शारीरीक व मानसिक त्रास दिलेला आहे. तसेच गैरअर्जदार हा दारु पिवुन सतत अर्जदारांना रात्री अपरात्री घराबाहेर हाकलुन देत असत व उपाशी पोटी ठेवुन मारहाण करीत असत व घाण–घाण शिवीगाळ करुन अर्जदाराचा मानसिक व शारीरीक व भावनिक छळ करीत असत. तसेच अर्जदारांना वाटेल तेंव्हा घराबाहेर काढुन माहेरी जाण्यास सांगत असत. अर्जदाराच्या माहेरकडील नातेवाईकांनी गैरअर्जदाराला समजावण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदाराच्या वागणुकीत काही फरक पडला नाही. गैरअर्जदाराला प्रकरणातील आदेशीका तामिल झाल्यानंतर तो प्रकरणात हजर न झाल्याने अर्जदाराचा पुरावा अविवादीत राहिला.

**१३.** कुठलिही स्त्री ही कोणत्याही कारणा शिवाय तिच्या पतीपासुन तसेच संसार सोडुन वेगळे राहणार नाही. अर्जदार ही जेंव्हापासून माहेरी राहाते, तेंव्हापासून गैरअर्जदाराने तिच्या उदरनिर्वाहाची काळजी घेतली नाही असा निष्कर्ष निघतो. सबब वरील कारणांकरिता गैरअर्जदाराने सबळ कारणाशिवाय अर्जदाराचा सांभाळ करण्यास नाकारले आहे असे सिध्द होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ व ३ करिताः–**

**१४.** अर्जदाराचे विद्वान वकील श्री. यु.के.काष्टे यांनी युक्तीवाद केला की, अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदाराने तिचा शारीरीक व मानसिक छळ केल्यामुळे तिला कोणताही कामधंदा होत नाही. तसेच अर्जदाराचा मुलगा अर्जदार अभिषेक हा अपंग असल्याने त्याची संपुर्ण सुश्रुषा ही अर्जदाराला करावी लागते व त्याची संपुर्ण जबाबदारी ही अर्जदारावरच आहे. तसेच, अर्जदार हिने तिच्या साक्षीत सांगितले की, तिला कोणताच कामधंदा होत नाही. याउलट गैरअर्जदार हा सधन कुटुंबातील सदस्य

असुन तो एका बागायती शेतकरी कुटुंबातील सदस्य असुन त्याच्याकडे पाच ते सहा एक्कर बागायती शेत जमीन आहे. त्यापासुन तो मोठे उत्पन्न मिळुन त्याला बारा ते तेरा लाख रुपयाचे निव्वळ नफा वर्षाकाठी शिल्लक राहतो. तसेच गैरअर्जदार याच्याकडे कुक्कुटपालनाचा व्यवसाय असुन त्यापासुन त्याला पाच ते सहा लाख रुपयाचा निव्वळ नफा मिळवतो. असे एकंदरीत वर्षाकाठी गैरअर्जदारास आठरा ते वीस लाख रुपयाचे उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे त्यांना पोटगी तो सहज देऊ शकतो. परंतु सदर उत्पन्नाबाबत ठोस असा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नसला तरी सदरची बाब खोडुन काढण्यासाठी गैरअर्जदाराने अर्जदाराचा उलटतपास घेतला नाही. तसेच गैरअर्जदाराने **रजनिश विरुध्द नेहा ए.आय.आर.२०२१ एस.सी.५६९** प्रमाणे शपथपत्र दाखल केले नाही.

**१५.** अर्जदार ही गैरअर्जदाराची कायदेशीर विधीवत लग्नाची पत्नी असून, लग्नानंतर तिचा उदरनिर्वाह करण्याची त्याची नैतिक जबाबदारी आहे. तसेच अर्जदाराने जरी गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर कागदोपत्री पुरावा दाखल केला नसला तरी अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेले सातबाराच्या प्रती निशाणी क्र.११ व १२ चे अवलोकन केले असता निशाणी क्र. ११ वरील सातबारामध्ये गैरअर्जदार व त्याच्या आईच्या नावाने अनुक्रमे ८५ आर व ५५ आर जमिन असल्याचे नमुद आहे तसेच निशाणी क्र.१२ वर गैरअर्जदाराच्या आईच्या नावे १० आर जमिन असल्याचे नमुद आहे. त्यामुळे गैरअर्जदार हा सधन कुटुंबातील सदस्य असुन तो एका बागायती शेतकरी कुटुंबातील सदस्य असुन त्याच्याकडे पाच ते सहा एक्कर बागायती शेत जमीन असल्याचे कथन हे गैरअर्जदाराने अव्हानीत न केल्याने किंवा त्याच्या तर्फे कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल न केल्याने अर्जदाराच्या कथनाला दुजोरा मिळतो.

**१६.** प्रत्येक पतीचे हे कर्तव्य आहे की, त्याने आपल्या पत्नीचा व्यवस्थित प्रकारे सांभाळ करावा. यापुर्वीच विवेचन केल्याप्रमाणे, गैरअर्जदाराने अर्जदार माहेरी गेल्यापासून तिच्या उदरनिर्वाहाची काळजी घेतली नाही. यावरुन गैरअर्जदाराने नक्कीच त्याच्या कर्तव्यामध्ये टाळाटाळ केलेली आहे. आजच्या महागाईच्या काळात जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमती, अर्जदार हिच्याकडे नसलेले उत्पन्नाचे साधन, तिला उदरनिर्वाहासाठी,

तसेच औषधोपचारासाठी स्वतंत्र अशा पैशांची गरज लागते. त्यामुळे सबब, वरील सर्व गोष्टींचा सारासार विचार करता मी या निष्कर्षास आलो आहे की, प्रस्तुतच्या प्रकरणात अर्जदार क्र. १ हिला प्रतिमहा रक्कम रुपये ५,०००/– (अक्षरी पाच हजार रुपये) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी प्रतिमहा रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी दोन हजार रुपये) असे एकुण रक्कम रुपये ९,०००/– (अक्षरी नऊ हजार रुपये) उदरनिर्वाहासाठी पोटगी गैरअर्जदाराकडून प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासुन मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल. म्हणून, मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र. ३ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**०१**. अर्ज अंशतः खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**०२**. गैरअर्जदार यास असा निर्देश देण्यात येते की, अर्जदार क्र. १ हिला प्रतिमहा रक्कम रुपये ५,०००/– (अक्षरी पाच हजार रुपये) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी प्रतिमहा रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी दोन हजार रुपये) असे एकुण रक्कम रुपये ९,०००/– (अक्षरी नऊ हजार रुपये) प्रतिमाह पोटगी म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन दयावेत.

**०३**. गैरअर्जदाराला असाही निर्देश देण्यात येतो की, त्याने या अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु. १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त) अर्जदारास द्यावेत.

**०४**. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत अर्जदारास विनाशुल्क देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

GAURAV ANANTRAO TARAL
Digitally signed by GAURAV ANANTRAO TARAL
Date: 2026.06.19 17:20:03 +0530

दिनांकः १९.०६.२०२६

(जि.ए.तराळ)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
सेलू जि. परभणी